# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.05.2025** **वार:सोमवार**

1. ऑपरेशन सिंदूर बदलत्या भारताचं प्रतिबिंब आहे; पंतप्रधानांचं मन की बातमध्ये प्रतिपादन
2. पुण्यातील अमित गोडसे यांच्या मधमाशी संवर्धनाच्या कामाची 'मन की बात'मध्ये पंतप्रधानांकडून दखल
3. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सुशासनावर विचारमंथन; ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल अभिनंदनाचा ठराव
4. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
5. खेलो इंडिया बीच स्पर्धेत 20 पदकं जिंकत महाराष्ट्राचा संघ उपविजेता आणि
6. मान्सून दक्षिण कोकणात दाखल; आगामी दोन दिवसही राज्यात जोरदार पावसाचा अंदाज

**मन की बात**

ऑपरेशन सिंदूर केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर ती आपला निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमाच्या 122व्या भागातून काल त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. ऑपरेशन सिंदूरनं जगभरातल्या दहशतवादाविरुद्धच्या लढ्याला नवा विश्वास आणि उत्साह दिला असल्याचं मोदी म्हणाले......

**'ऑपरेशन सिंदूर' के दौरान हमारी सेनाओं ने जो पराक्रम दिखाया है, उसने हर हिंदुस्तानी का सिर ऊँचा कर दिया है। जिस Precision के साथ, जिस सटीकता के साथ, हमारी सेनाओं ने सीमा पार के आतंकवादी ठिकानों को ध्वस्त किया, वो अद्भुत है। 'ऑपरेशन सिंदूर' ने दुनिया-भर में आतंक के खिलाफ़ लड़ाई को नया विश्वास और उत्साह दिया है।**

या मोहिमेनंतर संपूर्ण देशात वोकल फॉर लोकल या संकल्पनेलाही नवी ऊर्जा मिळाली आहे, असं सांगून प्रत्येकानं स्वदेश निर्मित वस्तूंना प्राधान्य देण्याचा निर्धार करावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. देशाच्या नक्षलग्रस्त भागात आता मूलभूत सोयी-सुविधा पोहोचत असल्याचं सांगताना महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यातल्या काटेझरी गावात पहिल्यांदाच बस सेवा पोहचल्याचं उदाहरण त्यांनी दिलं.....

**काटेझरी में आए इस परिवर्तन को आसपास के पूरे क्षेत्र में महसूस किया जा रहा है। अब यहां हालात तेजी से सामान्य हो रहे हैं। माओवाद के खिलाफ सामूहिक लड़ाई से अब ऐसे क्षेत्रों तक भी बुनियादी सुविधाएं पहुंचने लगी है।**

थोड्याच दिवसात आपण आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करणार आहोत असं सांगून, प्रत्येकानं योगाभ्यास अवश्य करावा असं आवाहन त्यांनी केलं. नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत देशभरातील क्रीडापटूंनी केलेल्या

उल्लेखनीय कामगिरीचं त्यांनी कौतुक केलं. यावेळी महाराष्ट्रातल्या अस्मिता ढोणे आणि साईराज चौधरी यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. लहान मुलांना आरोग्यदायी जीवनशैलीचं महत्त्व पटवून देण्यासाठी सीबीएसईच्या शाळांमध्ये राबवला जाणारा विशेष उपक्रम, स्वच्छ भारत मोहिमे अंतर्गत टाकाऊ कागदाची पुनर्निर्मिती, याबाबत त्यांनी माहिती दिली. 20 मे रोजी साजऱ्या झालेल्या जागतिक मधमाशी दिनाच्या अनुषंगानं विचार मांडताना ते म्हणाले की; मध केवळ गोडवा नाही तर आरोग्य,स्वयंरोजगार आणि स्वावलंबनाचं उदाहरण आहे. गेल्या 11 वर्षात भारतात मधमाशी पालनात एक मधुर क्रांती घडली असल्याचं त्यांनी सांगितलं. मधमाशांचं संरक्षण आणि संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल बोलताना मोदी यांनी पुण्याच्या वारजे परिसरातील अमित गोडसे यांच्या कामाचा आवर्जून उल्लेख केला. पंतप्रधानांनी मन की बातमध्ये आपल्या कामाची दखल घेतल्याबद्दल अमित गोडसे यांनी आनंद व्यक्त केला. याबाबत आकाशवाणीशी बोलताना ते म्हणाले...

**सर्व प्रथम मी पंतप्रधान मोदींना मी धन्यवाद करू ईश्चितो. कारण मी ऍक्सेप्ट नव्हतं, की माझं नाव येईल. खूप खूप छान वाटतंय, एवढ मधमाश्यांवर काम केल्यामुळे, स्पेशल अशी जाणीव झाल्यासारखी वाटते. मला या कामाला अजून पुढे न्ह्यायचं आहे, आत्ता मी फक्त पुण्यामध्ये करतोय, माझा उद्देश अख्या भारतामध्ये मधमाश्याचं संवर्धन करणं असं आहे.**

**<u>एनडीए परिषद</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षाच्या विविध राज्यातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसाची परिषद झाली. भाजपाच्या सुशासन विभागाच्या वतीने आयोजित या परिषदेत 'सुशासन' या विषयावर दीर्घ विचारमंथन झालं. या परिषदेला भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह हे उपस्थित होते. भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांची सत्ता असणाऱ्या विविध राज्यातील 20 मुख्यमंत्री आणि 18 उपमुख्यमंत्र्यांनी या परिषदेत भाग घेतला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते.

परिषदेनंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. ते म्हणाले की या परिषदेत दोन अभिनंदन प्रस्ताव मंजूर करण्यात आले; ऑपरेशन सिंदूर यशस्वी केल्याबद्दल भारतीय सैन्य दलाच अभिनंदन आणि जवानांच्या शौर्याच कौतुक करण्यात आल. तसच दुसऱ्या प्रस्तावात आगामी जनगणनेमध्ये जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल केंद्रसरकारच अभिनंदन करण्यात आलं.

**<u>अमित शहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. काल रात्री त्यांचं नागपूरमध्ये आगमन झालं. आज सकाळी 11 वाजता, अमित शहा यांच्या हस्ते जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन, कामठी तहसीलमधील चिंचोली इथ एनएफएसयूच्या कॅम्पसच भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर अमित शहा नांदेडला रवाना होणार असून तिथ ते जाहीर सभा घेणार आहेत. या जाहीर सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि भाजपचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. उद्या 27 मे रोजी शहा मुंबईतील श्री नारायण मंदिर माधवबाग आणि सर कावसजी जहांगीर हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

**<u>कोरोना</u>**

गेल्या दोन दिवसांत राज्यात एकंदर 93 नवीन कोविड रुग्ण आढळले आहेत. यापैकी 47 रुग्ण मुंबईत, 30 पुण्यात, 7 नवी मुंबईत, 3 ठाणे महानगरपालिका क्षेत्रात आणि 6 नागपूर महानगरपालिका क्षेत्रात आहेत. सध्या राज्यात 166 कोविड रुग्णांवर उपचार सुरू आहेत. कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करावा, लक्षणं आढळून आल्यास तातडीनं तपासणी करावी असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

**<u>खेलो इंडिया</u>**

दीवच्या समुद्र किनाऱ्यावर झालेल्या खेलो इंडिया बीच क्रीडा स्पर्धेची काल सांगता झाली. या पहिल्याच बीच स्पर्धेत महाराष्ट्राने 5 सुवर्ण पदकांसह, 5 रौप्य, आणि 10 कास्य अशी एकंदर 20 पदकं जिंकत उपविजेतेपद पटकावलं. मणिपूर संघाला विजेतेपद मिळालं. महाराष्ट्राने पेंचक सिलटमध्ये 3 सुवर्ण, 4 रौप्य आणि 5 कास्य अशी एकूण 12 पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. सागरी जलतरणातही 2 सुवर्ण, 1 रौप्य आणि 2 कास्य पदके मिळवली. बीच सॉकर, बीच कबड्डी या सांघिक खेळात कास्य पदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरले. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला उपविजेतेपदाचा करंडक प्रदान करण्यात आला.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या विविध भागात कालही पावसाचा जोर कायम होता. पुणे मुंबईसह सांगली सातारा इथही पावसाची संततधार होती.

सततच्या पावसामुळे सातारा, पाटण, महाबळेश्वर तालुक्यातील अनेक धबधबे पूर्ण क्षमतेने प्रवाही झाले आहेत. माण, खटाव, फलटण तालुक्यात पावसाचा जोर कायम असून माणगंगा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. आंधळी धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहत आहे. तर सततच्या पावसामुळे म्हसवड परिसरात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. फलटणची बाणगंगा नदी पूर्ण क्षमतेने प्रवाही झाली असून कोयना, वेण्णा, कृष्णा, उरमोडी नदीच्या पाणी पातळीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

सांगली जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडत असून ओढे, नाले भरून वाहत आहेत. शिराळा तालुक्यातील चांदोली परिसरात पडत असलेल्या पावसामुळ धबधबे प्रवाहित झाले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात गेले काही दिवस जोरदार पाऊस सुरू असून कालही जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू होती.

बुलढाणा जिल्हयात खामगाव, शेगाव, चिखली सह अनेक तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस सुरु असल्याने ज्वारीसह इतर पिकांचे मोठ नुकसान झाल्याचे वृत्त आहे. तसच गोंधनापुर, बुलडाणा शहरालगत साखळी, चिखली तालुक्यातील मंगरूळ, नवघरे अशा अनेक गावामध्ये शेतकऱ्यांच मोठ नुकसान झाल आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आजही बहुतांश ठिकाणी पावसाची तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे. मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<u>मान्सून</u>**

दरम्यान नैऋत्य मोसमी पाऊस काल दक्षिण कोकणात दाखल झाला असून, तो यावर्षी नेहमीपेक्षा 10 दिवस आधीच राज्यात दाखल झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या कृषी विभागानं शेतकऱ्यांना महत्त्वाचा सल्ला दिला आहे. आगामी दोन दिवस पावसाचे असले तरी 27 मे पासून पावसाचं प्रमाण हळूहळू कमी होईल; मे महिन्याच्या शेवटी कोकण वगळता बहुतांश भागात पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे, त्यामुळे पावसाची अपेक्षा करून शेतकऱ्यांनी कोरडवाहू जमिनीवर पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.